मी खूप आशीर्वादीत आहे, कारण परमेश्वराच्या कृपेने मला CLT च्या दर्शनाचा भाग होता आले. CLT चा अभ्यासक्रम पवित्र आत्म्यापासून आलेला आहे. याची सुरुवात शिष्यत्वापासून होवून शेवट नेतृत्वात होतो. प्रत्येक विषयाची सखोल आखणी, त्याचबरोबर अनुभवी व समर्पितरित्या सेवा करणारे प्रशिक्षक, सर्व बाबतीत असणारी शिस्त व विद्यार्थ्यांच्या राहण्याची व भोजनाची अतिशय उत्तम व्यवस्था ही वैशिष्ट्ये आहेत. आम्हां शिक्षकांसाठी येथे शिकविणे म्हणजे एक अपूर्व अशी संधीच वाटते. CLT म्हणजे एक कुटुंबच आहे! मी देखील आपणास खात्रीने सांगतो,... Come as a Student ... Leave as a Leader !

– CLT प्रशिक्षक : चार्ल्स जोसेफ, बेळगाव

CLT चे प्रशिक्षण मंडळ्यासाठी आणि विशेषत: पाळकीय सेवांमध्ये असणाऱ्यांसाठी खूपच आशीर्वादीत असे आहे. बऱ्याचदा मला असा अनुभव आला आहे, की माझ्या मंडळीतील प्रत्येक व्यक्तिला असे वाटते, की मी त्यांच्या घरी प्रार्थनेसाठी सतत यावे, त्यांच्या भेटीगाठी घ्याव्या, पण बऱ्याच वेळेस माझ्या मर्यादेमुळे हे शक्य होत नाही, त्यावेळी साहजिकच ते निराश होतात. अशा वेळेस मला सातत्याने असे वाटायचे, की मंडळीमध्ये Second Line Leadership तयार असणे गरजेचे आहे. प्रभूच्या कृपेने Second Line Leadership या प्रकारचे प्रशिक्षण CLT च्या माध्यमातून मिळत आहे, त्याद्वारे कुटुंब व मंडळ्या आशीर्वादीत होत आहेत. या प्रशिक्षणामधून बाहेर पडलेले पुढारी हे मंडळ्यांमध्ये अनेक आत्म्यांची भर पाडत आहेत. अशा प्रकारचे प्रशिक्षण हे काळाची गरज बनली आहे.

– पास्टर : सतीश घाटगे, सांगली

मी ऐन तारुण्यामध्ये पूर्णवेळ सेवेला सुरुवात केली. पण शुभवर्तमान सांगत असताना अनेक गोष्टींना सामोरे जावे लागत असे. या दरम्यान मी CLT च्या प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतला. मला इथे शिकावयास मिळाले, की प्रभू येशू ख्रिस्ताने प्रथम पुढारीपण केले, शिष्य घडवले व त्यातून त्याने शुभवर्तमान गाजवले. मला आनंद वाटतो, की CLT मध्ये मिळालेल्या शिक्षणाद्वारे माझ्या सेवेला फार मदत झाली. CLT मध्ये माझ्या सुप्त कलागुणांना वाव मिळाला. त्यामुळे मी परमेश्वरासाठी गीते लिहू शकलो, ती ध्वनिमुद्रित करु शकलो. ट्रिनिटी मिनिस्ट्रिजच्या उत्तेजनामुळे माझ्या गाण्यांच्या सीडीज लोकांच्या पर्यंत पोहचू शकल्या. यामुळे आज अनेकजण मला आराधनेसाठी बोलावतात... Thank you LORD, Thank you Trinity Ministries, Thank you CLT!!

– एक विद्यार्थी : CLT चा


निसर्गरम्य प्रशिक्षण केंद्र


प्रशिक्षण घेताना विद्यार्थी


एक दिवसीय सहल


सांस्कृतिक कार्यक्रम


सर्टीफिकेट वितरण सोहळा




# Church Leaders Training

*Come as a student, leave as a leader*

## TRINITY MINISTRIES

*Working Together Works*

2353, 'D' Ward, Juna Budhwar Peth, Bramhapuri, Kolhapur - 416 002. Mob. : 9860237095, 8600355111, Website : www.trinitycpt.com

## TRINITY MINISTRIES याविषयी

त्रैक्य देवावर विश्वास ठेवून व त्याने दिलेल्या दर्शनावर भरवसा ठेवून कार्य करणारे आम्ही जिवंत प्रभू येशू ख्रिस्ताचे सेवक आहोत. आम्ही कोणत्याही एका पंथाचे नाही आहोत तरी त्रैक्य देवावर विश्वास ठेवून सेवाकार्य करणाऱ्या मंडळ्या व पास्टर यांच्या सोबत देवाच्या राज्याच्या वाढीसाठी एकत्र झटत आहोत.

## CLT - CHURCH LEADER'S TRAINING विषयी दर्शन

लूक १०:२ नुसार मंडळीतील विश्वासणाऱ्यांना 'ख्रिस्ती पुढारीपणाचे' प्रशिक्षण देणे व त्यांना परमेश्वराने देवू केलेल्या दानाचा उपयोग करुन, मंडळीच्या सर्वांगीण उन्नतीसाठी व देवाच्या राज्याचे शुभवर्तमान सांगण्यासाठी सुसज्ज करणे.

## CLT अर्थात CHURCH LEADER'S TRAINING ची का गरज आहे?

प्रभू येशू ख्रिस्ताच्या सेवेचे व व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आहेत त्यापैकी एक ते म्हणजे त्याचे पुढारीपण व त्याने तयार केलेली Second Line Leadership होय. प्रभू येशू ख्रिस्ताने देवाच्या राज्याची घोषणा करीत असताना पुढारीपण केले, शिष्य घडवले व त्यानुसार शुभवर्तमान गाजवले.

वास्तविक, शुभवर्तमान गाजवण्यासाठी व शिष्य घडविण्यासाठी पुढारी तयार असणे हे खूप महत्वाचे आहे. आज आम्ही पाहतो, कि एक विश्वासणारा व्यक्ती आहे, त्याच स्तरावर राहून शुभवर्तमान सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. पण ख्रिस्तासारखे प्रभावी पुढारीपण करण्यासाठी त्याला ख्रिस्ती पुढारीपणाच्या प्रशिक्षणाची गरज आहे. CLT च्या या शिक्षणामधून मंडळ्यामध्ये Second Line Leadership तयार होईल, ते शिष्य घडवतील व त्यांच्याद्वारे मंडळ्यामध्ये आत्म्यांची भर तर पडेलच पण त्यासोबत एक नव्या नातेसंबंधांची बांधणी होऊन देवाचे शुभवर्तमान अधिक प्रभावीरितीने करता येईल अशी आमची खात्री आहे.

## CLT - CHURCH LEADER'S TRAINING मध्ये शिकवले जाणारे विषय :

### १ ले सत्र – सुवार्ताप्रसार

१) वैयक्तिक सुवार्ताप्रसार
२) भारत दर्शन
३) लहान लेकरांमध्ये सुवार्ताकार्य
४) तरुणांमध्ये सुवार्ताकार्य
५) सेवाकार्य करण्यासाठी पवित्रशास्त्रीय आधार
६) सेवाकार्यातील सुवार्ताप्रसार

### २ रे सत्र – शिष्यत्व

१) शिष्य घडवणे
२) ख्रिस्तामधील प्रगटीकरण (ICR)
३) आत्मा, मन व शरीर
४) दैवी मार्गदर्शन

### ३ रे सत्र – सदस्यत्व

१) मंडळी व मंडळीचे सभासदत्व
२) ख्रिस्ती कुटुंब
३) मंडळीचे मुलभूत पाच तत्वे
४) पवित्रशास्त्राचे सर्वेक्षण (जुना करार व नवीन करार)
५) निवासमंडप
६) पंथ व इतर धर्म

### ४ थे सत्र – नेतृत्व

१) पुढाऱ्यांतील कार्यक्षमता
२) अंत:करणातील खरेपणा
३) ध्येयबांधणी/वेळेचे नियोजन/संपर्कक्षेत्र/जबाबदारी सोपवणे
४) पवित्रशास्त्र आधारीत अर्थव्यवस्था
५) स्वनियंत्रण व आध्यात्मिक युध्द
६) अधीनता व आज्ञापालन

### ५ वे सत्र – भक्ती

१) स्तुती आराधना व शिष्ठाचार
२) परमेश्वरासोबतचे वैयक्तिक नातेसंबंध
३) उपदेश पध्दती
   – उपदेश कसा तयार करावा?
   – उपदेशाचे सादरीकरण कसे करावे?
४) आरोग्यशास्त्र व सामाजिक न्याय
५) इस्त्राएलचे सात सण
६) एकदिवसीय सहलीचे आयोजन

## CLT - CHURCH LEADER'S TRAINING ची वैशिष्ट्ये :

- CLT चे प्रशिक्षण म्हणजे Second Line Leadership तयार करणे होय. जे त्यांच्या पास्टर सोबत राहून मंडळीच्या सेवेला हातभार लावतील.
- अनुभवी व तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन व मराठी माध्यमातून शिक्षण.
- प्रशिक्षणाचा कालावधी हा दीड वर्षांचा आहे, तीन महिन्यातून सहा दिवसांचे प्रशिक्षण व एकूण पाच सत्रे आहेत.
- सेवेसाठी उपयुक्त ठरणाऱ्या सुप्त कलागुणांना संधी, विविध कार्यशालेचे आयोजन.
- या प्रशिक्षणाची अत्यल्प फी, प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर प्रमाणपत्र दिले जाते.
- महिलांसाठी व पुरुषांसाठी स्वतंत्ररित्या राहण्याची उत्तम व्यवस्था, दर्जेदार व उत्कृष्ट भोजन.
- निसर्गरम्य वातावरणात, शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी प्रशिक्षण.

## CLT - CHURCH LEADER'S TRAINING मध्ये कोण प्रवेश घेवू शकतात?

- मंडळीच्या सेवाकार्याला हातभार लावू इच्छिणारे विश्वासू स्त्री व पुरुष. वय २१ ते ६० वर्षे व शालेय शिक्षण किमान १० वी असावे.

## हितगुज...

ज्यावेळी मी CLT च्या दर्शनाकडे पाहतो त्यावेळी मला पवित्रशास्त्रामधील तो प्रसंग आठवतो, कि मोशेच्या वियोगानंतर सर्व इस्त्राएल लोक विवंचनेत होते आता पुढे कसे जायचे? त्यावेळी परमेश्वराची योजना तयार होती ती म्हणजे यहोशवाचे नेतृत्व, मोशेनंतरचे Second Line Leadership. हे खरे आहे कि एकटे पास्टर सर्व ठिकाणी पोहचू शकत नाहीत, सर्व गोष्टी हाताळण्यात त्यांना मर्यादा येतात. मला आनंद वाटतो, की ट्रिनिटी मिनिस्ट्रीजच्या माध्यमातून भक्कम Second Line Leadership तयार करण्याचे ओझे ते वाहत आहेत. या प्रशिक्षणाचा उपयोग त्या त्या स्थानिक मंडळीसाठी व पास्टरसाठी खूपच उपयुक्त असे आहे. मी नम्रतेने आवाहन करु इच्छितो, कि प्रत्येक मंडळीतील विश्वासणाऱ्या व्यक्तीने हे प्रशिक्षण पूर्ण करावे, जेणेकरुन Second Line Leadership भक्कम रीतीने उभी राहू शकेल.

– सिनियर पास्टर : सुरेश माने, कोल्हापूर